**ठळक बातम्या**

- पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर एलपीजी उत्पादन वाढवण्याचे सरकारचे तेल शुद्धीकरण कारखान्यांना आदेश

- महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचा आज शपथविधी

- समाजमाध्यमावर बदनामी रोखण्याच्या उपायांसाठी महाराष्ट्र सरकार पोलीस महासंचालकांची समिती स्थापन करणार

**आणि**

- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाला बीसीसीआय कडून १३१ कोटी रुपयांचं रोख बक्षीस जाहीर

**<><><><><>**

सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यात येणारे अडथळे आणि एलपीजी पुरवठ्याच्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर सरकारने तेल शुद्धीकरण कारखान्यांना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत. या अतिरिक्त उत्पादनाचा वापर घरगुती एलपीजी वापरासाठी करण्याचे आदेशही जारी करण्यात आले आहेत. सरकारने घरगुती एलपीजी पुरवठ्याला प्राधान्य दिलं असल्याचं, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने म्हटलं आहे. साठवणूक आणि काळाबाजार टाळण्यासाठी दोन सिलिंडरमधल्या नोंदणीचा कालावधी २५ दिवसांचा करण्यात आला आहे. दरम्यान, देशात अंदाजे १९० कोटी मेट्रिक टनापेक्षा जास्त वापरायोग्य तेलइंधन साठा, तसंच नैसर्गिक वायूइंधनाचा एक हजार ८०० अब्ज घनमीटरपेक्षा जास्त साठा उपलब्ध असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी राज्यसभेत दिली.

**<><><><><>**

पश्चिम आशियातील सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं नैसर्गिक वायूच्या उत्पादन, पुरवठा, समतोल वितरण आणि उपलब्धतेचे नियमन करण्यासाठी आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ लागू केला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू

मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यासाठी काही क्षेत्रांना प्राधान्य दिलं आहे. यामध्ये घरगुती वापरासाठी पाईपद्वारे पुरवला जाणारा नैसर्गिक वायू , वाहतुकीसाठीचा CNG, एलपीजी उत्पादन तसंच पाइपलाइन कॉम्प्रेसर इंधनाचा समावेश केला आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या भूराजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर सद्यस्थितीची चर्चा करण्यासाठी केंद्रीय वाणिज्य दूतावास आणि प्रवासी भारतीय व्यवहार सचिव श्रीप्रिया रंगनाथन यांनी सर्व राज्य आणि केन्द्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांसोबत दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठक घेतली. या क्षेत्रातल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी केल्या जाणाऱ्या उपायांची माहिती त्यांनी दिली. २८ फेब्रुवारीला संघर्ष सुरु झाल्यानंतर ६७ हजारांहून अधिक भारतीयांना मायदेशी सुखरूप आणण्यात आलं आहे, असं त्या म्हणाल्या.

<><><><><>

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचा आज शपथविधी समारंभ मुंबईत लोकभवन इथे दुपारी साडे चार वाजता होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर हे वर्मा यांना पदाची शपथ देतील.

<><><><><>

समाजमाध्यमावर बदनामीचे प्रकार थांबवण्यासाठी काय उपाययोजना करता येतील हे ठरवण्यासाठी राज्याच्या पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात येईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. राहुल कुल यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी राज्य सरकारने ४३ कोटींच्या निधीची तरतूद केल्याची माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याशिवाय महा सायबर सेफ ॲप हे ॲप्लिकेशन सुरू करण्यात येणार आहे, सायबर फसवणूक कोणकोणत्या प्रकारे केली जाते याची माहिती या ॲपवर असेल. दर महिन्याला नागरिकांना जनजागृतीसाठी २१ कोटी मेसेज पाठवले जातील, असं कदम यांनी सांगितलं. प्रशांत ठाकूर, विकास ठाकरे यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत ४ हजार मेगावॉट वीजनिर्मिती झाली असून याद्वारे ८ लाख शेतकऱ्यांना निरंतर वीज दिली जात असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. या वर्षाच्या शेवटी अतिरिक्त १० हजार मेगावॉट वीज तयार केली जाणार असून यामुळे ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा निरंतर वीज दिली जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. नाना पटोले यांनी याबाबत प्रश्न विचारला होता.

**<><><><><>**

राज्यातल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक संवर्गात एकंदर ११ हजार ९१८ जागा रिक्त असून त्यापैकी सुमारे ५ हजार ५०० पदं भरायची मान्यता मिळाल्याची माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. रणजितसिंह मोहिते-पाटील आणि इतरांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. या शैक्षणिक वर्षात ही भरती पूर्ण होईल, असं त्यांनी सांगितलं. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तासिका तत्त्वावर प्राध्यापकांची नियुक्ती करायची गरज राहणार नाही, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. गरज भासली, तर त्यांचीही भरती करू, असंही ते म्हणाले. उच्च शिक्षणसंदर्भात पीएम उषा योजनेच्या धर्तीवर राज्यात सीएम उषा योजना प्रस्तावित असल्याचंही त्यांनी नमूद केलं. राज्यातल्या १५ विद्यापीठांमध्ये एकंदर २ हजार ६०० शिक्षकीय पदं मंजूर असून त्यापैकी १ हजार ४९७ पदं रिक्त आहेत. यातल्या ६८७ पदं भरायची मान्यता मिळाली आहे, असं सरकारनं लेखी उत्तराद्वारे सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या हकालपट्टीची मागणी करणारा अविश्वास प्रस्ताव आज लोकसभेत मांडण्यात आला. विरोधकांच्या गदारोळामुळे १२ वाजेपर्यंत तहकूब झालेलं सभागृहाचं कामकाज पुन्हा सुरु झाल्यावर काँग्रेसचे खासदार डॉक्टर मोहम्मद जावेद यांनी हा प्रस्ताव मांडला. सभापती बिर्ला यांनी विरोधी पक्षनेत्यांना सभागृहात बोलू दिलं नाही तसंच विरोधी पक्षाच्या महिला खासदारांबाबत असंसदीय वक्तव्य केलं, असा आरोप जावेद यांनी यावेळी केला. सदनाचं कामकाज चालवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निष्पक्ष दृष्टिकोनाचा अभाव बिर्ला यांच्या वागण्यात दिसून आला, असंही ते म्हणाले. सध्या लोकसभेत या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१० मार्च २०२६ - मंगळवार

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी आज केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या स्थापना दिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. औद्योगिक सुरक्षा दल देशभरातल्या पायाभूत सुविधांच्या सुरक्षेसंदर्भात महत्वपूर्ण भूमिका निभावत आहे, असं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमांवरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. औद्योगिक सुरक्षा दल कर्मचाऱ्यांची समर्पित वृत्ती हे देशभक्ती आणि व्यावसायिक नैतिकतेचं प्रतीक आहे, असं अमित सहा यांनी म्हटलं आहे. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शहीदांना त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या केरळ आणि तामिळनाडू राज्यांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान प्रधानमंत्र्यांच्या हस्ते केरळ एर्नाकुलम इथं सुमारे १० हजार ८०० कोटी रूपये खर्चाच्या विविध विकास कामांचं लोकार्पण होणार आहे. त्यानंतर तामिळनाडूत तिरुचिरापल्ली इथंही ५ हजार ६५० रुपये खर्चाच्या अनेक विकास कामांचं लोकार्पण प्रधानमंत्री करणार आहेत.

<><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघावर बक्षिसांचा वर्षाव होत आहे. बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून या संघाला १३१ कोटी रुपयांच्या रोख बक्षिसाची घोषणा करण्यात आली आहे. संघाचे १५ खेळाडू, प्रशिक्षक कर्मचारी आणि इतर सहाय्यकांचा त्यात समावेश आहे. यापूर्वी २०२४मध्ये रोहित शर्मा याच्या नेतृत्वाखालील संघाने जिंकलेल्या विश्वचषकासाठी त्यांना १२५ कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

<><><><>

नेपाळ प्रतिनिधी सभेसाठी झालेल्या निवडणुकीत थेट निवडल्या जाणाऱ्या सर्व १६५ जागांची मतमोजणी पूर्ण झाली असून बालेंद्र शाह यांच्या नेतृत्वाखालच्या राष्ट्रीय स्वतंत्र पक्षानं १२५ जागांवर ऐतिहासिक विजय मिळवला आहे. नेपाळी काँग्रेस पक्षाला १८ तर यू.एम.एल. पक्षाला १० जागांवर समाधान मानावं लागलं आहे. प्रमाणशीर प्रतिनिधीत्व मोजणी ९० पूर्ण झाली असून लवकरच निवडणूक आयोग राष्ट्रपतींकडे अहवाल सादर करेल.

<><><><>

जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत आज मोठी घसरण झाली. ब्रेंट क्रूडची किंमत सुमारे साडेआठ टक्क्यांनी घसरून प्रति बॅरल साडे ९२ डॉलरवर आली आहे. तर अमेरिकेत ही कच्च्या तेलाच्या किमतीतही जवळपास ९ टक्क्यांची घसरण होऊन ती प्रति बॅरल ९९ डॉलर्स  ६०  सेंटपर्यंत खाली आली आहे.

पश्चिम आशियातला संघर्ष सुरू होण्यापूर्वीच्या तुलनेत कच्च्या तेलाच्या किमती अजूनही सुमारे ३० टक्क्यांनी जास्त आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध लवकरच संपेल, असं वक्तव्य केल्यानंतर तेलाच्या किमतीत ही घसरण झाल्याचं सांगितलं जात आहे.

दरम्यान, तेलाच्या किमतींत घसरण झाल्यानं आशियाई शेअर बाजारांतील सकाळच्या सत्रातील व्यवहारात तेजी दिसून आली.

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धामुळे एलपीजी सिलेंडरच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. त्याचा मोठा फटका हॉटेल व्यवसायिकांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर तामिळनाडूच्या चेन्नईच्या हॉटेल व्यावसायिक संघटनांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांना पत्र पाठवून यात लक्ष घालण्याची विनंती केली आहे. चेन्नई शहरात व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या पुरवठ्यात तुटवडा निर्माण झाल्यामुळे त्याचा पुरवठा अत्यावश्यक सेवांच्या यादीत समाविष्ट करावा, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष एम. रवी यांनी या पत्रातून केली आहे.

**//<><><><><>//**